# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 11 May 2024

# Time 7.10 AM to 7.20 AM

# Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक ११ मे २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार आज थांबणार-परवा सोमवारी मतदान
- दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाकडून एक जून पर्यंत अंतरिम जामीन
- डॉ नरेंद्र दाभोलकर हत्येप्रकरणी दोघांना जन्मठेप आणि ५ लाख रुपये दंड-पुराव्या अभावी तिघांची सुटका

आणि

- औरंगाबाद लोकसभा मतदार संघात मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून प्रोत्साहन पुरस्कार

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार आज संपत आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांच्या प्रचाराने आता जोर धरला आहे. या टप्प्यात राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, परवा १३ मे रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी लागणारे साहित्य, साधन-सामुग्री मतदान केंद्रावर पुरवण्यात आलेली आहे. मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस. चोक्कलिंगम यांनी काल मंत्रालयात पत्रकार परिषदेत ही महिती दिली. या अकरा मतदार मतदारसंघांत एकूण २९८ उमेदवार निवडणूक लढवत असून, एकूण २३ हजार २८४ मतदान केंद्रांवर, ५३ हजार ९५९ बॅलेट युनीट, २३ हजार २८४ कंट्रोल

युनीट आणि २३ हजार २८४ व्हीव्हीपॅट यंत्राच्या आधारे, दोन कोटी २८ लाख १ हजार १५१ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

दरम्यान, पोलीस अधिकारी हेमंत करकरे यांच्या मृत्यूसंदर्भात काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या वक्तव्यावरुन त्यांच्याविरोधात नागपुरात गुन्हा दाखल झाला असून, भाजपानं वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित केलेल्या वादग्रस्त जाहिराती प्रकरणी, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याविरोधात ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची माहिती चोक्कलिंगम यांनी दिली.

दरम्यान, तिसऱ्या टप्प्यात राज्यातल्या अकरा मतदारसंघात एकूण सरासरी ६३ पूर्णांक ५५ शतांश टक्के मतदान झाल्याचं त्यांनी सांगितलं.

****

भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नंदुरबार इथं महायुतीच्या उमेदवार हिना गावित यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. वंचित वर्गाच्या आरक्षणाच्या रक्षणासाठी आपण सदैव कार्यरत राहून, अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्गाचं आरक्षण कमी करुन धर्माच्या आधारे आरक्षण देऊ देणार नाही, याचा मोदी यांनी पुनरुच्चार केला. काँग्रेस मात्र या मुद्द्यावर काहीही बोलायला तयार नसल्याचा दावा त्यांनी केला. राष्ट्रपतिपदासाठी द्रौपदी मुर्मू यांना विरोध, राम मंदिरासंदर्भात काँग्रेसची भूमिका या मुद्यांवरूनही त्यांनी टीका केली. सीकल सेल ॲनिमिया निर्मुलनासह नंदुरबारमधल्या विकासकामांचा दाखला त्यांनी दिला.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल पुण्यात महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचार सभा घेतली. भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गेल्या दहा वर्षांच्या कार्यकाळामुळे विरोधकांसमोर यंदाच्या निवडणुकीत काहीही मुद्दे शिल्लक नसल्याचं, राज ठाकरे यांनी नमूद केलं.

****

औरंगाबाद लोकसभा मतदार संघातले महायुतीचे उमेदवार संदिपान भुमरे यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे काल छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर होते. बुथ प्रमुखांच्या मेळाव्याला त्यांनी मार्गदर्शन केलं. ही निवडणूक देशाच्या विकासासाठी, सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी आणि देशाला महासत्ता बनवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचं, त्यांनी नमूद केलं.

शिंदे यांनी काल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर इथं सभा घेतली. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या काँग्रेससंदर्भातल्या भूमिकेशी एकनिष्ठ न राहिल्याबद्दल माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर त्यांनी टीका केली.

****

औरंगाबाद लोकसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या प्रचारासाठी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर सभा घेतली. महागाई, कृषीमालाला हमीभाव, उद्योगधंद्यांचं परराज्यात पलायन यासह अनेक मुद्यांवरून त्यांनी सत्ताधारी पक्षावर टीका केली. जालना इथंही महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ काल महाविकास आघाडीची सभा झाली. मात्र काही कारणामुळे उद्धव ठाकरे या सभेस पोहोचू शकले नाहीत. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, अमित देशमुख यांच्यासह महाविकास आघाडीच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी सभेला उपस्थित जनसमुदायाला संबोधित केलं.

****

अहमदनगर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्यासाठी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी काल अहमदनगर इथं सभा घेतली, तर महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी जिल्ह्यातल्या भातकुडगाव फाटा इथं सभा घेतली.

****

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ठाणे लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून संध्याकाळी सव्वा सात वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम सामाजिक संपर्क माध्यमांवरूनही ऐकता येईल.

****

मद्यधोरण प्रकरणी अटकेत असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयानं एक जून पर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला आहे. लोकसभा निवडणूक प्रचारासाठी न्यायालयानं केजरीवाल यांना ही मुभा दिली असून, दोन जून रोजी आत्मसमर्पण करण्यास सांगितलं आहे.

****

छत्तीसगडमधे, बिजापूर जिल्ह्यात काल सुरक्षादलांशी झालेल्या चकमकीत १३ नक्षलवादी मारले गेले. जिल्हा राखीव दल आणि विशेष कृती दलाचं संयुक्त पथक शोधमोहिम राबवत असताना ही चकमक घडली. सुमारे चार तास चाललेल्या या चकमकीत दोन सैनिकही जखमी झाले.

****

अंधश्रद्धा निर्मुलन क्षेत्रात कार्यरत ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी, सचिन अंदुरे आणि शरद कळसकर यांना पुण्यातल्या विशेष न्यायालयानं, जन्मठेप आणि पाच लाख रुपये दंड ठोठावला आहे. मात्र या प्रकरणातले अन्य आरोपी डॉ. विरेंद्र तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची न्यायालयानं पुराव्या अभावी, सुटका केली आहे. न्यायालयाच्या या निर्णयाचं दाभोलकर कुटुंबियांनी स्वागत केलं आहे. मात्र पुराव्याअभावी मुक्तता केलेल्यांना शिक्षा व्हावी यासाठी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचं दाभोलकर यांच्या कन्या मुक्ता दाभोलकर यांनी म्हटलं आहे. पुण्यात सुमारे ११ वर्षांपूर्वी २० ऑगस्ट २०१३ च्या सकाळी दाभोळकर यांची हत्या झाली होती.

****

औरंगाबाद लोकसभेच्या निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झालं असून, मतदान प्रक्रियेची सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विविध पुरस्कार देणार असल्याचंही जाहीर केलं. ७५ टक्क्यांपर्यंत मतदान झालेल्या गावांना आणि पंचायतींना समृद्ध लोकशाही गाव, ग्रामपंचायत पुरस्कार दिला जाणार आहे. तर ९० टक्क्यांपर्यंत मतदान झालेल्या गृहनिर्माण सोसायटी आणि एक हजारापेक्षा अधिक कामगार असलेल्या औद्योगिक संस्थांना देखील, समृद्ध लोकशाही गृहनिर्माण सोसायटी आणि औद्योगिक संस्था पुरस्कार दिले जाणार आहेत.

****

जालना लोकसभा मतदारसंघात अत्यावश्यक सेवेतील अधिकारी, कर्मचारी तसंच पोलीस कर्मचाऱ्यांनी काल जालना जिल्हाधिकारी कार्यालयात टपाली मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदानाचा हक्क बजावला. दरम्यान, १३ मे या मतदानाच्या दिवशी

जालना कृषी उत्पन्न बाजारसमितीचे व्यवहार बंद राहणार असल्याचं समितीकडून कळवण्यात आलं आहे.

****

वैशाख शुद्ध तृतीया अर्थात अक्षय्य तृतीयेचा सण काल साजरा झाला. भगवान परशूराम आणि महात्मा बसवेश्वर यांची जयंतीही आज साजरी झाली. यानिमित्तानं छत्रपती संभाजीनगर, लातूर, नांदेडसह सर्वत्र अभिवादन, शोभायात्रा, वाहनफेऱ्यांसह विविध कार्यक्रम घेण्यात आले.

तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी मातेची काल अलंकार महापूजा मांडण्यात आली होती. श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी अर्पण केलेले विविध दागिने देवीला घालण्यात आले होते. असंख्य भाविकांनी काल देवीचं दर्शन घेतलं.

****

नांदेड इथल्या खासगी वित्त कंपन्यांच्या कार्यालयावर आयकर विभागाने काल छापेमारी केली. नाशिक आयकर विभागातील जवळपास शंभर अधिकारी आणि कर्मचारी सकाळी सात वाजल्यापासून शहरातल्या शिवाजी नगरामधल्या पाच ते सात ठिकाणी तपास करत होते, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

जालना जिल्ह्यातल्या परतूर नगरपरिषदेचा मुख्याधिकारी अभिषेक परदेशी याच्यासह फायरमन अनिल पारीख यांना ५५ हजार रुपयांची लाच घेताना काल लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं रंगेहाथ अटक केली. परतूर नगरपरिषदेतून बल्लारपूर इथं बदली झालेल्या कर्मचाऱ्याचं निलंबन काळातील पगार बिल काढून दिल्याचा मोबदला तसंच बदली झालेल्या ठिकाणी सेवापुस्तिका आणि पगारपत्रक पाठविण्याकरता त्यांनी ही लाच मागितली होती.

****

नांदेड जिल्ह्यात एक प्रवासी जीप गोदावरी नदीत पडल्याने गाडीतील दोन जण जागीच ठार झाले. काल सायंकाळी मुदखेडहून मारतळाकडे जात असलेली जीप येळी – महाटी पुलावरून नदीपात्रात कोसळली. रात्री उशीरापर्यंत नदीपात्रात तपास मोहीम सुरू असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात काल अनेक भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावली. अनेक घरांवरचे पत्रे उडून गेले. या दरम्यान दोन

वेगवेगळ्या घटनांमध्ये दोघांचा मृत्यू झाला.  दरम्यान, पुढील दोन दिवस मराठवाडा आणि विदर्भात सोसाट्याचा वारा तसंच गारपीट होण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

****

अमृतसर इथून सुटणारी अमृतसर नांदेड सचखंड एक्सप्रेसची उद्या रविवारची फेरी रद्द करण्यात आली आहे. प्रवाशांना होणाऱ्या असुविधेबद्दल दिलगीर असल्याचं दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क कार्यालयानं कळवलं आहे.

****

इंडियन प्रिमियर लीग – आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल गुजरात टायटन्सनं चेन्नई सुपर किंग्जचा ३५ धावांनी पराभव केला. गुजरातच्या संघानं प्रथम फलंदाजी करत २० षटकात २३१ धावा केल्या. शुभमन गिलनं १०४, तर साई सुदर्शननं १०३ धावा केल्या. प्रत्यूत्तरादाखल चेन्नईचा संघ निर्धारित षटकात आठ बाद १९६ धावाच करु शकला.

आज या स्पर्धेत कोलकाता नाईट रायडर्स आणि मुंबई इंडियन्स संघात सामना होणार आहे.

****